# # मी TOO



नयना परदेशी

> '# मी टू' ही सामाजिक चळवळ असली तरी त्यातूनही बरेच काही साध्य झाले आहे. आमिर खानसारखा कलावंत '# मी टू'ला पाठिंबा देताना अशा आरोपींबरोबर काम करण्याचे नाकारतो तेव्हा या चळवळीचा परिणाम दिसून येतो. या चळवळीच्या माध्यमातून स्त्रिया बोलायला पुढे येत आहेत, त्याचे स्वागत व्हायला हवे.



# '#We टू'

"बी वेअर... ट्रेंड स्वीट्ट मे बी टुमारोज मी टू"... "# me too" च्या विरोधात पुरुषांची कॅम्पेन "Pi too"

तनुश्री दत्ताच्या केसनंतर "# मी टू" चळवळ जोरात सुरू झाली आणि व्हॉट्सअ‍ॅपवर अशा विनोदांचा पाऊस पडला. अतिशय बेफिकीरपणे, बेजबाबदारपणे व्यक्त होण्याची अहमहमिकाच लागली आणि "तनुश्री दत्ता इतकी वर्षं झोपली होती का" इथपासून बॉलिवूडमध्ये अशा तडजोडी स्वत:हून करणाऱ्या स्त्रिया अशा तक्रारी कशा करू शकतात असे अनेक प्रश्न उपस्थित झाले. मुळात '# मी टू' ही चळवळ प्रथम परदेशात सुरू झाली ती लैंगिक शोषणाला सामोरे जावे लागणाऱ्या स्त्रियांनी व्यक्त व्हावं... आपल्यासारखा अनुभव इतर स्त्रियांनाही आला आहे, येतो आहे हे पीडित स्त्रीला कळावे म्हणून! 'होय, मीसुद्धा हे अनुभवलं आहे आणि ते सांगण्याचं धाडस मी करते आहे कारण त्यात माझा काही गुन्हा नाही आहे' असं व्यक्त होणं हेच या चळवळीकडून अपेक्षित आहे. या बोलणाऱ्या स्त्रियांना मदत देणं, त्यांचं ऐकून घेणं व आरोपीच्या अधिकारांना बाधा न आणता त्यावर काही उपाय करणं हे गरजेचं व शक्य आहे.

सर्वोच्च न्यायालयानं 'विशाखा' निकालात आणि त्यानंतर आलेल्या 'कामाच्या ठिकाणी होणारे स्त्रियांचे लैंगिक शोषण (अटकाव, प्रतिबंध व निवारण) कायदा, २०१३'मध्ये हे स्पष्ट केलेलं आहे की स्त्रियांनाही समानतेचा, सन्मानानं जगण्याचा व सुरक्षित वातावरणात काम करण्याचा मूलभूत अधिकार आहे. आपल्या पितृसत्ताक समाज पद्धतीत स्त्रियांचं दमन व शोषण ही सामान्य बाब आहे आणि स्त्रियांचं लैंगिक शोषण करणे हा तिचा गैरफायदा घेण्याचा, तिच्या आत्मसन्मानाला ठेच पोचवण्याचा, तिच्यावर सत्ता गाजवण्याचा एक सोपा मार्ग समजला जातो. कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण झाल्यास स्त्रीचा कामाचा किंवा काम करून सन्मानानं जगण्याचा मूलभूत अधिकारच हिरावला जातो आणि म्हणूनच "कामाच्या ठिकाणी होणारे स्त्रियांचे लैंगिक शोषण (अटकाव, प्रतिबंध व निवारण) कायदा, २०१३" हा अतिशय महत्त्वाचा कायदा असून प्रत्येक आस्थापना, सरकारी, निमसरकारी संस्था, कार्पोरेशन्स, स्पोर्ट्स अकॅडेमीज, शैक्षणिक संस्था, रुग्णालयं, प्रत्येक खासगी आस्थापना, करारावर काम करणारे अशा सर्वांना लागू आहे. हा कायदा केवळ सुसंघटित (Organized) क्षेत्रासाठीच आहे हा समज पूर्णपणे खोटा असून संघटित व असंघटित अशा दोन्ही क्षेत्रांसाठी हा कायदा आहे. जे जे कामाचं ठिकाण आहे ते ते या कायद्याच्या प्रभावाखाली येतं, मग ते तुमचे-आमचे घरही असेल. होय.. आपल्या घरात काम करणाऱ्या नोकराणीसाठी आपले घर ही कामाची जागा आहे आणि तिथे तिचं लैंगिक शोषण झाले तर तिला न्याय मागण्याचा पूर्ण अधिकार या कायद्याने दिला आहे.

या कायद्यानं प्रथम 'लैंगिक शोषण' म्हणजे काय याची व्याख्या केली असून थोडक्यात 'लैंगिक सुखाची मागणी, लैंगिक सुखासाठी पुढाकार घेणं, अश्लील साहित्य दाखवणं, पाठवणं, अश्लील शेरेबाजी करणं या बरोबरच स्त्रीला मान्य नसणारं मौखिक वा शारीरिक कोणतंही लैंगिक स्वरूपाचं वर्तन' हे लैंगिक शोषणात येते. लैंगिक शोषणाला सामोरी जाणारी स्त्री पोलिसात सहज तक्रार करू शकत नाही हे जाणून या कायद्यानं १० पेक्षा जास्त कर्मचारी असणाऱ्या प्रत्येक आस्थापनेसाठी 'अंतर्गत समिती' (पूर्वीची अंतर्गत तक्रार निवारण समिती) असणं बंधनकारक केलं असून या समितीत ५० टक्के स्त्रिया, अध्यक्षपदी स्त्री व एका गैरसरकारी संस्थेच्या प्रतिनिधीचा समावेश हा बंधनकारक करण्यात आला आहे. दहापेक्षा कमी कर्मचारी असणाऱ्या आस्थापनांमधील तक्रारीसाठी जिल्हास्तरीय 'स्थानिक समिती'ची स्थापना करण्यात आली असून त्यातही ५० टक्के स्त्रिया, अध्यक्षपदी स्त्री, दोन गैरसरकारी संस्थांच्या प्रतिनिधींचा समावेश व महिला व बालविकासखात्याच्या अधिकाऱ्याचे प्रतिनिधित्व असणं बंधनकारक आहे. या कायद्यातच तक्रार कशी करावी, समितीनं कशा पद्धतीनं चौकशी करावी, किती दिवसांत चौकशी करावी, अहवाल कुणाला सादर करावा, चौकशी अहवाल मालकावर बंधनकारक असून तो त्याला स्वीकारावाच लागतो, या सर्व बाबी स्पष्ट केलेल्या आहेत. या कायद्यानुसार अशी समिती स्थापन न केल्यास मालकाला रु. ५०,०००/- पर्यंत दंड होऊ शकतो व मध्यंतरी वोडाफोन कंपनीला असा दंड करण्यात आलेला आहे.

या ज्या समिती कायद्यानुसार असणं गरजेचं आहे त्यांनी फक्त लिखित तक्रारीवरच कारवाई करणं अपेक्षित नाही तर एखादीनं तोंडी तक्रार केली किंवा प्रत्यक्ष तक्रार न करता समितीला इतर मार्गानं लैंगिक शोषणाची माहिती मिळाली तरी समिती औपचारिक कार्यपद्धत वापरू शकते, जसं की त्या महिलेशी संवेदनशीलतेनं बोलणं, तिला गरज असेल तसे उपचार, समुपदेशन यांची सोय करणं व इतर प्रतिबंधात्मक पावलं उचलणं इत्यादी. महिलेला रीतसर कारवाई गरजेची वाटत नसेल व अनौपचारिक कारवाई पुरेशी असेल तर लेखी तक्रारीचा आग्रह न धरता समिती अशी कारवाई करू शकते. कारण या कायद्यानुसार स्त्रियांसाठी कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण निर्माण करणं ही मालकाची जबाबदारी आहे. एखाद्या स्त्रीनं लैंगिक शोषणाविरुद्ध पोलिसतक्रार केली तर ती मात्र क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या तरतुदीनुसार चालेल. मात्र सध्या जो "#मी टू" चळवळीवर उगीचच पुरुषांची बदनामी केल्याचा आरोप केला जातो आहे तो जाणूनबुजून केला जात असून त्या पुरुषाला बदनामीचा दावा दाखल करण्याची मुभा आहे हे सोयीस्कर दुर्लक्षित केलं जात आहे.

तनुश्री दत्ताच्या तक्रारीचा विचार करता, काम करताना अयोग्य व अनुचित स्पर्श केल्याची तिची तक्रार असल्यानं ती वर उल्लेखलेल्या कायद्याच्या कक्षेतच येते व तिच्या तक्रारीची व 'मी टू' चळवळीतील तक्रारींची अनौपचारिक दखल संबंधित समित्यांनी घ्यायला हवी. मग प्रश्न असा आहे, की तेव्हा किंवा आताही बॉलिवूडमध्ये किंवा सिने असोसिएशनतर्फे अशी कायद्यानं बंधनकारक असणारी समिती का स्थापन केली नव्हती? (नुकतीच अशी समिती करण्यात आली आहे असं ऐकिवात आहे.) या समितीच्या स्थापनेसाठी, कायद्यात बंधनकारक केलेल्या जागृती व प्रशिक्षण (awareness and training) कार्यक्रमासाठी काय प्रयत्न झाले? किती कलाकारांना याची माहिती होती वा आहे? केवळ बॉलिवूडच नव्हे तर अशा अनेक आस्थापना आहेत जिथे अशा समित्या नाहीत, असल्या तर त्या कायद्यात दिल्याप्रमाणे नाहीत, त्यामध्ये गैरसरकारी संस्थेचं प्रतिनिधित्व नाही ही वस्तुस्थिती आहे आणि त्यावर कुणाचीही देखरेख नाही. खर तर कायद्याने बंधनकारक केलेल्या या समितीने वर्षातून किमान एकदा सर्व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण करणे अनिवार्य आहे, तसेच प्रत्येक आस्थापनेची लैंगिक हिंसेला प्रतिबंध करणारी पॉलिसी असणेही बंधनकारक आहे.

आम्ही आमच्या 'व्हॉईस फॉर जस्टिस' या गैरसरकारी संस्थेतर्फे या कायद्याचं प्रशिक्षण व जागृतीचे कार्यक्रम करतो, धोरण तयार करायला मदत करतो आणि गैरसरकारी संस्थेचे प्रतिनिधी म्हणून समितीवर काम करतो तेव्हा लक्षात येतं की कितीतरी सुशिक्षित, उच्च विद्याविभूषित लोकांना या कायद्याची माहिती नाही. एखाद्या स्त्रीकडे टक लावून बघणं या 'पीतल की जवानी' सारखी गाणी म्हणणं हे त्या स्त्रीला मान्य नसेल तर ते तिचं लैंगिक शोषण आहे, असे आम्ही सांगतो तेव्हा अनेक भुवया उंचावल्या जातात. पण, अशा अनेक कृती केवळ या कायद्याखालीच नव्हे तर "फौजदारी कायदा सुधारणा २०१३"नुसारही गुन्हा आहेत हे पुरुषांना कळण्याची गरज आहे, म्हणजे सहज जाता जाता किंवा चालतंय म्हणून वेगवेगळ्या माध्यमातून होणारं लैंगिक शोषण थांबेल. पितृसत्ताक पद्धतीचा प्रभाव अजूनही आपल्यावर कसा आहे याचा एक अनुभव मध्यंतरी आला. एका मोठ्या सरकारी कार्यालयात एका तरुण मुलीनं तिच्या सहकाऱ्यानं कार्यालयात, हॉस्टलमध्ये येऊन लैंगिक शोषण केल्याबद्दल समितीकडे तक्रार केली. समितीच्या सदस्यांनी 'त्या मुलाची नोकरी जाईल, तो एकटाच कमावता आहे' म्हणून तिच्यावरच दबाव टाकून तक्रार मागे घेण्यास सुचवले. समिती सदस्यांचे योग्य प्रशिक्षण झाले नसल्यास काय होतं याचं हे उत्तम उदाहरण!

'# मी टू' ही सामाजिक चळवळ असली तरी त्यातूनही बरंच काही साध्य झालं आहे. आमिर खान यांच्यासारखा कलावंत '# मी टू'ला पाठिंबा देताना अशा आरोपितांबरोबर काम करण्याचे नाकारतो तेव्हा या चळवळीचा परिणाम दिसून येतो. या चळवळीच्या माध्यमातून स्त्रिया बोलायला पुढे येत आहेत त्याचं स्वागत व्हायला हवं, त्यावर उपाय व्हायला हवेत आणि सर्वांकडून एक नवीन चळवळ "# वुई टू अगेन्स्ट सेक्शुयल हॅरॅसमेंट" सुरू व्हायला हवी.